# सह्याद्रीतली अनोखी दिंडी

'लहानपणी मी जेव्हा हे डोंगर पाहिले, तेव्हा मी या डोंगरांवर कधी पोहोचेन, असं कधीच वाटलं नव्हतं. त्यामुळेच आज एवढ्या लोकांच्या साथीने माझा वाढदिवस साजरा होतो आहे आणि तोही सह्याद्रीतल्या इतक्या मनोरम डोंगरावर... तुम्हा सर्वांशिवाय मी कदाचित यापैकी कोणतेच डोंगर पाहू शकले नसते. बरोब्बर १२ वर्षांपूर्वी मी हरिश्चंद्रगडावरच माझ्या डोंगरयात्रेची सुरुवात केली आणि आज यूएसला उड्डाण करण्यापूर्वीचा माझा टप्पा इथेच साजरा होतोय, हेही विशेष...' बोरिवलीची रूपल दवे सांगत होती. टाळ्यांचा कडकडाट गुहेच्या दगडांवर घुमत होता, तोच पश्चिमेच्या दिशेने दहा वर्षांची लहानगी रमा उत्साहात तिथे अवतरली. कोकणकड्याकडच्या अत्यंत खडतर अशा नळीच्या वाटेने दहा तासांची खडतर मार्गक्रमणा करून ती तिथे आली होती. बरोबरच्या ट्रेकर्सइतकाच तिचा उत्साह अजूनही ओसंडून वाहत होता.

गेल्या आठवड्यात हरिश्चंद्रगडावर सुमारे दीडशे डोंगरयात्रींचं एक संमेलन भरलं होतं. त्यात हरिश्चंद्रगडाला असलेल्या विविध वाटांनी असे डोंगरयात्री तिथे जमत होते. निमित्त होतं, मुलुंडच्या चक्रम हायकर्स या संस्थेच्या रौप्यमहोत्सवाचं. वर्षभर चालणाऱ्या या रौप्यमहोत्सवाची नांदी करण्यासाठी संस्थेने सह्याद्रीमध्ये एक अनोखी दिंडीच जणू आयोजित केली होती. गेली २५ वर्षं गिरीभ्रमंतीची आवड सर्वदूर पोहोचवण्यात सातत्यशीलता आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणं हे संस्थेचं वैशिष्ट्य ठरलं. दरवर्षाआड होणारं विविध गड-किल्ल्यांच्या भ्रमंतीचं सह्यांकन हे तर अनेकविध वयोगटांतल्या निसर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरू लागलं. त्यात कळसूबाई, अलंग-कुलुंग-मदनगडांचे कठीण रूट्सही पार पडले आणि प्रत्येक उपक्रमात दीड-पावणेदोनशे लोकांपर्यंत ही आवड रुजत गेली.



अलीकडच्या काळात तर हिमालयातील गिर्यारोहण मोहिमांपासून लडाखची मोटारसायकल रॅली आणि सह्याद्रीतील विविध सुळके सर करेपर्यंत विविध उपक्रम संस्थेतर्फे हाती घेण्यात येत आहेत. रौप्यमहोत्सवी वर्षातील विविध उपक्रमांचा प्रारंभ ट्रेकर्सच्या लाडक्या हरिश्चंद्रगडावर करण्याचं एक विशेष औचित्य होतं. रौद्रभीषण कोकणकडा, भन्नाट वाऱ्यावर खडा पहारा देणारी रोहिदास-तारामती ही शिखरं, शिरशिरी आणणाऱ्या पाण्याचं केदारेश्वराचं तळं आणि केदारेश्वराचं दगडी सुंदर मंदिर ही हरिश्चंद्रगडाची वैशिष्ट्यं सर्वच ट्रेकर्सना स्मरणीय ठरणारी. इथे या आठवणींना उजाळा द्यायचा होताच. पण दुसरंही एक कारण होतं.

२५ वर्षांपूर्वी ज्या गडावर संस्थेच्या डोंगरयात्रेची सुरुवात झाली, त्याच गडावर आजच्या पिढीतल्या ट्रेकर्सनी विविध परिसरातल्या २५ किल्ल्यांना भेटी देऊन इथे यायचं आणि आतापर्यंतच्या वाटचालीतील सर्व सुहृदांनी इथे भेटायचं, असं या उपक्रमाचं स्वरूप होतं. अशा मोहिमेला खूप काटेकोर नियोजन लागतं.

मंगेश देशपांडेच्या नेतृत्त्वाखाली कोकणकड्याच्या सरळसोट उभ्या वाटेने म्हणजेच नळीच्या वाटेने हरिश्चंद्रगड गाठायचा, असं एका टीमने ठरवलं. या टीमने आधी सिंहगडापासून मार्गक्रमणा केली होती. अनिकेत चौधरीच्या नेतृत्त्वाखाली



